(CNRMHSN110012232022)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५३१/२०२२ निशाणी १७ लगत सरतपास**

फिर्यादीने आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात पुराव्यात कागद दाखल करण्याबाबतचे कथन केलेले आहे. आरोपीचे वकील हजर आहेत. युक्तीवाद ऐकला.

सबब खालील आदेश करण्यात येतो –

१४. या कामी निशाणी ३/१ कडे फिर्यादीने धनादेश क्र.२४०१६९ सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही त्याने ओळखली आहे व तो त्यांना दिला असल्याचे सांगितले आहे. **(सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.२० देण्यात येते.)** निशाणी ३/२ कडे सांगोला बँकेचे चलन जोडलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(चलनास निशाणी क्र.२१ देण्यात येते.)** निशाणी ३/३ कडे धनादेश अनादरीत झाल्याबाबत सांगोला अर्बन बँक या बँकेचा मेमो सादर केला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.२२ देण्यात येते.)**

१५. तसेच कामी निशाणी ३/४ कडे आरोपीस पाठवलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यावरील सही फिर्यादीने ओळखलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.२३ देण्यात येते.)** निशाणी ३/५ कडे आरोपी पाठवलेल्या नोटीसची पोस्टाची स्लिप दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.२४ देण्यात येत आहे.)** तसेच निशाणी ३/६ कडे आरोपीला नोटीस मिळाल्याबाबतची पोस्टाची पोहोच पावती दाखल केली आहे. त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. त्यातील

(CNRMHSN110012232022)

मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.२५ देण्यात येत आहे.)**

१६. निशाणी ३/७ कडे संस्थेचा ठराव जोडलेला आहे. त्यावर संस्थेचे सचिव यांची सही व संस्थेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(ठरावास निशाणी क्र.२६ देण्यात येत आहे.)** निशाणी १८/१ कडे आरोपीचा कर्ज खात्याचा खाते उतारा दाखल केला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(कर्ज खातेउता–यास निशाणी क्र.२७ देण्यात येत आहे.)** निशाणी १८/२ येथे आय.टी. कायद्याप्रमाणेचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर प्रमाणपत्रास निशाणी क्र.२८ देण्यात येत आहे.)**

**आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.06.12 17:26:35 +0530

आटपाडी.

दिनांक : १२/०६/२०२४

(अ. जो. बाचुळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी